सूचना का अधिकार

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज, जि.सांगली.

## Government Medical College, Miraj Dist-Sangli

Tel:0233/2232090-99 Fax:2231959 E-mail:-deangmcmiraj@yahoo.co.in

जा.क्र./शावैममि/व्ही.आर.डी.एल/कंत्राटीपदे/जाहिरात/३२३ /२०२५ दिनांक:- १०.०१.२०२५

## जाहिरात

**विषय:- व्ही.आर.डी.एल (VRDL) सुक्ष्मजीवशास्त्र विभाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज अंतर्गत राबविण्यात येणा-या राष्ट्रीय उपक्रमांसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कंत्राटी पध्दतीने करारतत्वावर (१२० दिवसांकरिता) पदे भरणेबाबत...**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज अंतर्गत सूक्ष्मजीवशास्त्र विभागमधील व्ही. आर. डी. एल. (Virus Research & Diagnostic Laboratory) या प्रयोगशाळे अंतर्गत राबविण्यात येणा-या राष्ट्रीय उपक्रमांसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर (१२० दिवसांकरिता) खाली दिलेल्या तक्त्यानुसार पदासाठी नेमणूक करावयाची असून यासाठी इच्छूक उमेदवारांनी अर्ज करावेत. **अर्जाचा नमुना, अटी व शर्ती** या संस्थेच्या संकेस्थळावर www.gmcmiraj.edu.in उपलब्ध करण्यात आलेला आहे. अर्ज स्वहस्ते खाली नमुद केलेल्या ठिकाणी विहित कालावधीत सादर करावा. ई - मेल, पोस्ट, कुरियरने पाठवलेले, एकाच पदासाठी एकापेक्षा जास्त वेळा केलेले अर्ज व अपुर्ण अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे अर्हतेबाबतच्या सर्व प्रमाणपत्रांच्या (२) दोन छायांकित प्रती स्वप्रमाणीकरण करुन जोडाव्यात, व मुलाखतीच्यावेळी अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्राच्या मुळ प्रती सादर करणे आवश्यक आहे.. तसेच या पदांकरीता अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथे मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे. भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | एकत्रित वेतन प्रतिमाह | वय |
|---|---|---|---|---|---|
| १ | रिसर्च सांयटिस्ट-१/ सायंटिस्ट - बी (मेडिकल) | ०१ | १) भारतीय आयुर्विज्ञान परिषद / राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग मान्यता प्राप्त एम.बी.बी.एस पदवी<br>२) Maharashtra Medical Council नुसार वैध नोंदणी आवश्यक.<br>३) एम.डी मायक्रोबायॉलॉजी असलेल्या उमेदवारास प्राधान्य<br>४) संशोधन व अध्यापनाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य.<br>५) MUHS विद्यापीठातून व महाराष्ट्र शासन संस्थेतून एम.बी.बी.एस उत्तीर्ण असलेल्या उमेदवारास प्राधान्य. | रु. ५६,०००/- + HRA प्रतिमहिना | कमाल ३५ वर्षे |
| २ | लॅबोरेटरी टेक्निशियन | ०१ | १) महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त विद्यापीठातून / महाराष्ट्र शासनमान्य संस्थेतून पोस्ट ग्रॅज्युएट, डिप्लोमा इन लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी (PG-DMLT) अथवा बॅचलर ऑफ पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी लॅबोरेटरी (BPMT-Laboratory Science)<br>२) Maharashtra Paramedical Council Act 2011 नुसार वैध नोंदणी आवश्यक.<br>३) शासनमान्य प्रयोगशाळेत १ वर्षांचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य. | रु. २०,०००/- + HRA प्रतिमहिना | कमाल ३० वर्षे |

* इ.मा.व./इ.डब्यु.एस. व एस.सी./एस.टी. उमेदवारांना अनुक्रमे ०३ व ०५ वर्षे वयामध्ये सवलत. जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक

**अर्ज स्विकारण्याचा कालावधी** : दिनांक ११/०१/२०२५ ते २१/०१/२०२५

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण**: **व्ही.आर.डी.एल.सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज**

(कार्यालयीन कामकाजाचे दिवशी, सकाळी १०.०० ते सायं.५.०० वाजेपर्यंत)

**मुलाखतीचे ठिकाण**: **अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज.**

Scanned with OKEN Scanner

**पात्र उमेदवारांची यादीः-** दि.२७.०६.२०२५ रोजी व्ही.आर.डी.एल (VRDL) सुक्ष्मजीवशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज कार्यालयीन सुचना फलकावर व संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(मुलाखतीस पात्र उमेदवारांचा मुलाखतीचा/लेखी परिक्षेचा दिनांक व वेळ या यादीत नमुद करण्यात येईल.)

**अटी व शर्तीः**

१) सदरची नियुक्ती हि पुर्णपणे कंत्राटी तत्वावर असलेने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना शासकीय कर्मचारी यांना मिळणाऱ्या सोई सुविधांचा लाभ मिळणार नाही.

२) नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाब अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.

३) करार पद्धतीवरील नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

४) करार पद्धतीवर नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता हे नियमितपणे घेतील. आढावा असमाधानकारक असल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राहतील.

५) करार पद्धतीच्या उमेदवारास विभागाचे प्रमुख व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली आपले कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित पूर्ण वेळ काम करणे बंधनकारक राहील. सदर पदे ही साथरोग नियंत्रण प्रकल्पांतर्गत असल्याने परिसरात उद्भवणा-या साथरोगांच्या उद्रेकांच्या वेळी प्रसंगानुरुप उद्रेकाच्या ठिकाणी जाऊन कामकाज करावे लागेल.

६) करार पद्धतीतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी व त्या अनुषंगिक लाभासाठी कोणताही हक्क राहणार नाही.

७) करार पद्धती वरील निवड झालेल्या उमेदवारांनी कामावर रुजू होण्यापूर्वी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याची लेखी हमी रु.५०० च्या स्टॅप पेपरवर प्रतिज्ञापत्र / करारपत्र नोटरी करुन कामावर रुजू होताना सादर करणे आवश्यक आहे. तसेच पदाच्या नियुक्ती आदेश संदर्भीत घेऊन मा. न्यायालयात कायमस्वरुपी कामावर सामावून घेणे बाबत याचिका दाखल करणार नसल्याबाबत निवड झालेल्या उमेदवाराकडून प्रतिज्ञापत्र (५०० रु.बॉन्ड पेपरवर) लिहून घेण्यात येईल.

८) नियम व अटींच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देण्यात येतील. उच्च शैक्षणिक धारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

९) उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. एमएस- सीआयटी किंवा तत्सम संगणक परिक्षा उर्तीर्ण प्रमाणपत्र अपेक्षीत आहे, नसल्यास सदर प्रमाणपत्र नियक्तीपासुन तीन महिन्यांच्या आत संस्थेत सादर करावे लागेल अन्यथा नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१०) मुलाखतीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची संख्या जर मोठया प्रमाणात असेल तर पात्र उमेदवारांची आवश्यकतेप्रमाणे लेखी परीक्षा (मराठी + इंग्रजी + सामान्य ज्ञान + बॅकेचे ज्ञान) घेण्यात येईल. लेखी परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.

११) निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील यासाठी कोणतेही निवेदन/तक्रार विचारात घेतले जाणार नाही.

१२) कोणतीही पूर्वसूचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार निवड समितीने राखून ठेवले आहेत.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज

प्रत माहितीसाठी सविनय सादर,
मा. संचालक, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना.

Scanned with OKEN Scanner

## अर्जाचा नमुना

पासपोर्ट आकाराचा एक फोटो चिकटवून त्यावर उमेदवाराने स्वाक्षरी करावी व एक फोटो सोबत आणावा.

प्रति,
मा. अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज.

**पदाचे नाव** :..............................................

१. अर्जदाराचे नाव : ...................................................................

२. अर्जदाराचे नावात बदल असल्यास : ...................................................................

३. जन्मदिनांक : ...................................................................

४. जात : ...................................................................

५. पत्रव्यवहाराचा पत्ता: ...................................................................

६. कायमस्वरुपी पत्ता: ...................................................................

७. ई-मेल आयडी : ...................................................................

८. दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र.: ...................................................................

९. संगणकाचे ज्ञान (एमएस-सीआयटी किंवा तत्सम संगणक परिक्षा उर्तीर्ण प्रमाणपत्र)
आहे नाही

१०. शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | संस्था/ विद्यापीठाचे नाव | टक्केवारी | श्रेणी | प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |



पुढील पानावर...

Scanned with OKEN Scanner

११. अनुभवाचा तपशील:

| अ.क्र. | कामकाजाच्या ठिकाणाचे नाव | पदनाम | कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२. अतिरिक्त शैक्षणिक अर्हता:

ठिकाण:

दिनांक: उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

सहपत्रे:

१) शैक्षणिक अर्हताचे प्रमाणपत्रे (गुणपत्रिका, पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्रे, कौन्सिल रजिस्ट्रेशन,)
२) जन्मतारखेचा दाखला अथवा एस.एस.सी. उत्तीर्ण प्रमाणपत्र
३) जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र
४) एमएस- सीआयटी किंवा तत्सम संगणक परिक्षा उर्तीर्ण प्रमाणपत्र
५) नावात बदल असल्यास गॅझेट प्रमाणपत्र
६) अनुभवाचे प्रमाणपत्र
७) ओळखपत्रे (आधार कार्ड किंवा पॅनकार्ड )

Scanned with OKEN Scanner